INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# आनंददायी शिक्षण आणि विध्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

## (Pleasant Learning and Holistic Development of Students)

**डॉ. अर्चना ठाकरे**
पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग,
रा. तू. म. नागपुर विद्यापीठ, नागपुर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2023-29257211/IRJHIS2307003

**गोषवारा:**

आनंददायी शिक्षण हे अध्ययनामध्ये भावना, आश्चर्य, जिज्ञासेला पोषण देणारी संकल्पना आहे. विध्यार्थी समूह आणि शिक्षक यामधील आंतरक्रियेला प्रोत्साहन देणारी प्रक्रिया आहे. अध्ययनातील अभिरूची निर्माण करून निर्धारित ध्येयापर्यंत पोहचणे हाच या शिक्षणाचा पाया होय. हे शिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यस्ततेवर, प्रेरणा आणि अध्ययन निष्पत्तीवर प्रभाव पाडत असते. त्यांच्या वाढ व विकासावरही आनंददायी शिक्षण परिणामकारक ठरते. ज्यामुळे आजीवन शिक्षणाला चेतना मिळते.

आनंददायी शिक्षण म्हणजे आश्चर्य आणि कुतुहलाचा आनंद घेत पुर्णपणे व्यस्त राहून अध्ययन करणे होय. शिक्षक व विद्यार्थी दोघेही समत्वभावाने अध्ययन व अध्यापनात नवीन अनुभवघेतात. अभिरुची व हेतु निश्चित असून त्यानुसार अध्ययन अनुभव दिले व घेतले जातात खऱ्या अध्ययनाचा अनुभव घेण्यासाठी आनंददायी शिक्षण उपयुक्त आहे. यामुळे सहकार्य संबंध, देवाणघेवाण आणि स्वाभिमानही जागृत होतोसर्वात उपयुक्त व महत्वपूर्ण म्हणजे ताणविरहित वातावरणामध्ये अध्ययन व अध्यापनाचे अनुभव शिक्षक व विध्यार्थ्यांना घेता येतात. वर्तमान स्थितीमध्ये आनंददायी अध्ययनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळावा या हेतूने नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये काही मुद्दे सविस्तरपणे मांडण्यात आलेले आहे.यासंबंधीचे विवेचन पुढील लेखात करण्यात आलेले आहे.

**सूचक शब्द** : विध्यार्थी, शिक्षणप्रक्रिया, अध्यापन, अध्ययन, आनंददायी शिक्षण, अभ्यासक्रम, शालेय, वर्ग

**प्रस्तावना :**

अध्ययनार्थीच्या बौद्धिक आणि भावनिकतेला सकारात्मक ऊर्जा देणारी संकल्पना म्हणजेच आनंददायी शिक्षण प्रक्रिया होय. अध्ययन प्रक्रियेच्या माध्यमातून आनंद व समाधान देणारा उपक्रम आनंददायी शिक्षणात आहे. आनंददायी शिक्षणाकरिता निरनिराळे उपक्रम राबविण्याची संकल्पना अनेक शिक्षणतज्ञ व अभ्यासकांनी दिलेली आहे. विविध खेळ, कथाकथन इत्यादींचा समावेश

अध्ययनात करून अध्यापन व अध्ययन प्रभावी करणे, याकरिता आनंददायी शिक्षण महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थी स्वतःच्या कुवत व इच्छेनुसार एखादी क्रिया करून ज्ञान अवगत करीत असेल व त्या सर्जनशील कृतीचा आनंद घेत असेल, तरच ते खरे व उपयुक्त असे अध्ययन होय. विद्यार्थी कृतीच्या माध्यमातून स्वतःच्या ज्ञानाची रचना करतो, त्यातून मिळणारा आत्मविश्वास प्रेरणा देणारा असतो. स्वतः स्वतःचे ज्ञान मिळविणे म्हणजेच कायमस्वरूपी ज्ञान निर्माण होणे होय. यामुळे विद्यार्थी वर्ग वातावरणात तसेच वर्गाबाहेरही विविध अध्ययन संकल्पना विषयी विचार प्रवण होतो. उदाहरणार्थ: ग्रंथालयात पुस्तके शोधणे, विद्यार्थी मित्रांशी अभ्यास विषय व अभ्यास संकल्पना विषयी चर्चा करणे. इंटरनेट व इतर माध्यमाद्वारे विषयासंबंधीत माहिती शोधणे इत्यादी. आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांना क्रियाशील करते आणि या क्रियाशीलतेमुळे विद्यार्थी अनुभवी होतो त्यातील यश अपयश चुका व प्रत्याभरण यामुळेच विद्यार्थ्यांमधील कौशल्य व प्रसंगावधान वृद्धिंगत होते मूलतः हेच खरे शिक्षण होय. आनंददायी शिक्षणासाठी विशिष्ट अभ्यासक्रम रचना पाहिजे असे नाही, तर चालू अभ्यासक्रमाद्वारे सुद्धा विद्यार्थ्यांना बौद्धिक आणि भावनिक दृष्ट्या सकारात्मक व प्रेरणादायी अध्ययन परिस्थिती उपलब्ध करून देता येते. प्रत्येक विषय घटकांच्या अध्यापनासाठी तीच तीच रटाळ व कंटाळवाणी अध्यापन पद्धती वापरल्यास विद्यार्थी अध्ययन प्रवृत्त होत नाही तो कंटाळवाणा होतो. अध्ययनात अवधान व अभिरुची टिकवून ठेवू शकत नाही पर्यायाने प्रभावी अध्ययन होत नाही. अध्यापन प्रक्रियेत योग्य त्या घटकांसाठी, योग्य त्या संकल्पनेसाठी अगदी उपयुक्त अशी अध्यापन पद्धती वापरणे. विविध पद्धतींचे नियोजन करून अध्यापन करणे व विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला अनुसरून अध्ययन अनुभव देणे हीच विद्यार्थ्यांची अध्ययन अभिरुची टिकविण्याचे नियोजन व प्रक्रिया होय.

**वर्तमान स्थिती :**

सद्य परिस्थितीतील विद्यार्थी हा यंत्रागत हालचाली करताना आढळतो. सूचना दिल्यास त्या सूचनांचे पालन करणे. 'येरे माझ्या मागल्या' अशी दुरावस्था विद्यार्थ्यांची झालेली दिसते अभ्यासक्रमातील संकल्पनांचे व्यवस्थित आकलन न झाल्याने अर्धवट ज्ञानग्रहण करणारे श्रोते म्हणजे आजचे विद्यार्थी होय. परीक्षा आधारित घटकांची पोपटपंची करून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. जुन्या प्रश्नपत्रिकांचा आधार घेऊन अभ्यास करणे व पास होणे हेच आदर्श मार्ग आमच्या विद्यार्थी समूहाला अवगत आहेत. मला ज्ञानेश्वरांविषयी अधिक माहिती नाही, कारण आम्हाला ज्ञानेश्वर वीस मार्कांचेच होते. असे विचार विद्यार्थी व्यक्त करताना दिसतो. त्यामुळे वर्तमान विद्यार्थी कुठल्याही पाठ्य घटकाच्या खोलवर शिरून त्याचा विस्तृत व्यापकपणे अभ्यास करण्यास उत्सुक नसतो. परिणामतः भविष्यातील विद्यार्थी तत्त्वज्ञानी, विचारवंत, अभ्यासक, साहित्यिक, शास्त्रज्ञ या गटात येणारच नाही का? अशी भीती निर्माण झाली आहे. स्व-परीश्रमातून, स्व-जाणिवेतून स्वतःच्या क्रियाशीलतेतून उत्साहीपणे जर विद्यार्थी ज्ञान अंगीकृत करू शकला, तर ते

शिक्षण प्रभावी व परिणामकारक शिक्षण असे सिद्ध होईल.

सद्य परिस्थितीतील पाठ्यक्रमातील ज्ञान आशयाचा अवाका फार मोठा आहे. तो नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या अट्टाहासाने शिक्षक व विद्यार्थी यांची शारीरिक व मानसिक क्षमता पणाला लागलेली दिसते. या सर्वांमुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड भावनिकताण असतो. बाजारामध्ये एखादी वस्तू निर्माण करण्याकरिता कच्चामाल जसा मशीन मध्ये टाकून चुटकी सरशी वस्तू निर्माण होते त्याचप्रमाणे विद्यार्थी घडविणे म्हणजे यांत्रिक कार्य झालेले आहे. याचा परिणाम भविष्यामध्ये महाभीषण असणार आहे.तणावपूर्ण वातावरणात घडणारा विद्यार्थी कितपत जीवनातील समस्यांना व स्वतःच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यास सक्षम होतो हे अजूनही विचाराधीन आहे 'शिक्षण म्हणजे रोजगार निर्माण करणे नव्हे' हे जरी खरं असलं, तरी वर्तमानात आयुष्याच्या संस्कारक्षम बालपणापासून ते तारुण्यावस्थेपर्यंत औपचारिक शिक्षणाचे धडे घेणारे विद्यार्थी, विशिष्ट वयानंतर स्वतःचे पोट भरण्यास तयार होऊ शकत नसेल, तर ही देखील एक चिंतनीय बाब आहे. पंधरा वर्षे व त्याहून जास्त काळ शिक्षण घेणारा विद्यार्थी जर स्वत:ची उपजीवीका भागवू शकत नसेल, तर आयुष्याची ही वर्षे तो काय शिकला? हा प्रश्न निर्माण होतो.

**आनंददायी शिक्षण व संशोधने :**

आनंददायी अध्ययन पद्धती ही शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये औपचारिकतेच्या नात्याला दूर सारते. आपूलकीचे, विश्वासाचे नाते दृढ करते. आंतरक्रियेच्या आधारे क्षमतेनुसार व आवडीनुसार विद्यार्थी सहगतीने अध्ययन पूर्ण करतो. प्रत्येक प्रकल्पातून अवगत केलेली कौशल्ये व अभिरुचि ही भिन्न-भिन्न असल्याने, विद्यार्थ्यांच्या क्षमताव कुशलता वृद्धिंगत होतांना दिसतात. म्हैसूर मधील हेग्गडदेवनकोटे तालुक तील एम.एन. बाईग्स यांनी 1995 मध्ये सूक्ष्म नियोजनाद्वारे क्रियाशीलता आधारित अध्ययनाचे नियोजन केले. वर्गातील भिंतीच्या मर्यादावाढवून चार्ट आणि हस्तकार्याच्या माध्यमातून सहजपणे अवगत करण्यायोग्य अध्यापन साधनांची निर्मिती केली. कला, हस्तकला, गाणी, नृत्य आणि इतर साधनांद्वारे कृती पद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अध्ययन केले. ज्याचा अतिशय अनुकूल परिणाम त्यांना अनुभवायला मिळाला.

शिक्षकाची प्रयोगशीलता ही आनंददायी शिक्षण निर्माण करू शकते. ज्ञानोपासना किंवा ज्ञान संपादन करणे, यापलीकडचे कुठलेही सुख नाही. 'स्वदेश पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते' यानुसार विद्वत्ता प्राप्त करणे हे महत्त्वपूर्ण सुख, आनंद व संपादन होय. ही विद्वत्ता जर शालेय माध्यमाच्या संस्कारातून निर्माण होत असेल, तर हेच उपयोगी शिक्षण आहे. शंकर बळी गोरेगाव मुंबई 2021 यांनी नंदादीप महाविद्यालयातून मराठी विषयाचे रंजक व आनंददायी शिक्षण देण्यासाठी प्रकल्प पद्धतीचा वापर करून अध्यापन केले. मराठी विषयांतर्गत आकारिक मूल्यमापनाचा आधार घेऊन विद्यार्थ्यांमध्ये भाषा क्षमता, शब्द सौदर्य व साधनशीलता शोधण्यासाठी कवितासंग्रहाची संकल्पना साकारली. शब्दसंपदा शोधणे व ती वाढविण्यासाठी प्रकल्प रचला. याकरिता त्यांनी 32 पानांच्या 116

शब्दसमूहाला पुस्तक रूपाने प्रकाशित केले. व्यवसाय ओळख याकरिता सुद्धा विद्यार्थ्यांना चार विषय दिले गेले. यासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके उपलब्ध करून दिली. अशा प्रकारे अनेक प्रकारचे प्रयोग करून आनंददायी अध्ययनाचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. समूह प्रकल्पातून आनंददायी शिक्षण शंकर बळी यांनी प्रत्यक्ष रूपाने दिलेले आहे.

ताण आणि चिंतेला कमी करण्यासाठी विविध आव्हान आणि अनिश्चितते पासून मुक्त असा आनंदी वर्ग असतो. (पोलक 2003) आनंददायी अध्ययन हे असहिष्णुता, भीती आणि लवचिकतेला योग्य वातावरण देते. रटाळ व कंटाळा काढून टाकते. (वीलीस 2007) आनंददायी वर्गातील शिक्षक हा विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत करू शकतो

आनंददायी शिक्षण हे शालेय स्तरावर किंवा उच्च स्तरावरील समान पद्धतीने राबविता येते. यातील खेळकरपणा व तत्काळ प्रत्याभरण प्रोत्साहन देणारे आहे. (स्टन-स्मिथ 1997) अध्ययनातील शिकण्याचा आनंददायी घटक अध्ययन कर्त्यांमध्ये उत्कृष्ट समाजीकरणाकरिता कारणीभूत ठरतो. सहकार्याची भावना सामूहिकतेने रुजली जाते. (पिगेट 1967 वायगोत्स्की 1962)

आनंददायी अध्ययनामुळे उत्कृष्ट शैक्षणिक परिणाम प्राप्त झाले आहेत (बोड्रोरा आणि लिओंग 2005) तसेच सहानुभूतीची भावना ही निर्माण झाली आहे. प्राथमिक स्तरावर जर या शिक्षणाचा अनुभव बालकांना मिळत असेल तर त्याचा दूरगामी परिणाम त्यांच्या अध्ययनावर होतो.(कुलहान आणि इतर 2000)

आनंददायी शिक्षण हे विद्यार्थ्यांना प्रेरणा चिकाटी व त्यांच्यातील समवयस्क संवाद वृद्धिंगत करते. (हेऊन, 2005 शिंपले 2008, सेलीग्मन 2002) त्यामुळे एकाग्रता, कुतूहल आणि मोकळेपणा वाढते. आनंदी शिक्षण स्मृती संचय वाढविते. (ॲन्डरसन 1999) त्याचप्रमाणे अध्ययनातील सक्रियता देखील वाढविते. (देवे 1938 सिंग 2012)

आनंददायी शिक्षणाचा पाया हा प्राथमिक स्तरापासूनच भक्कम केला पाहिजे. बालवयातच नवनवीन संकल्पना ग्रहण करण्याची कुवत बालकांमध्ये असते. भाषिक क्षमता व गणितीय क्षमता याच काळात बालकांमध्ये प्रभावीपणे रुजल्या जातात. यासंबंधीच्या संकल्पना समजतांना आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून शिकविल्या गेल्या तर त्या चांगल्या प्रकारे, कायमस्वरूपी विद्यार्थ्यांना कळतील. या मूलभूत संकल्पना सविस्तर व अचूकपणे अवगत झाल्या तर त्या आधाराने भविष्यातील संबंधित ज्ञानरचना निश्चितच उत्तम प्रकारे समजतील. विद्यार्थी योग्य ध्येय अर्जित करू शकतील.

डॉ. अनुराधा मेहता 2021 यांच्यानुसार आनंददायी शिक्षण हे ताण विरहित अध्यापन वातावरण निर्माण करते. आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांना नवदृष्टिप्रदान करते व उत्साही बनविते. विद्यार्थ्यांना आनंदी व खेळकर पद्धतीने अध्ययन अनुभवांमध्ये व्यस्त राहण्यास सक्षम करते.

विद्यार्थ्यांना उपयुक्त शिक्षण सामग्री, साजेशी अध्यापन पद्धती आणि सुयोग्य शिक्षण माध्यम उपलब्ध असल्यास विद्यार्थी ज्ञानकण सहजपणे ग्रहण करतो. योग्य शिक्षक असल्यास

अध्यापन प्रक्रिया सुलभव रंजक होते. यामुळे विद्यार्थी अध्ययनात सकारात्मकतेने सहभागी होतो. उत्साही व माहितीपूर्ण अध्यापन प्रक्रिया विद्यार्थ्यांना उपयुक्त अध्ययन अनुभव देण्यास पुरेशी असते. म्हणूनच आनंददायी शिक्षण प्रक्रिया विज्ञान विषयाचे अध्ययन प्रभावीपणे करू शकते.

आनंदी अवबोध हा अध्ययनार्थीच्या प्रेरणेवर सकारात्मक प्रभाव टाकतो. (किरीककाया इ.बी.व इतर 2010) विद्यार्थ्यांना गणित विषयामध्ये गुणाकार शिकण्यास मदत करण्याकरिता आनंददायी कार्यनीती वर्ग अध्ययनप्रणाली (JCLS) वापरल्यास विद्यार्थ्यांची प्रेरणा आणि अध्ययन प्रक्रिया दरम्यान आनंदी धारणा सुधारते. प्रत्येक विद्यार्थी जलद आणि अचूकपणे माहिती प्राप्त करून अध्ययन प्रभावीपणे करतो.

ट्रेजर क्लू खेळाच्या कार्यनीतीद्वारे विद्यार्थ्यांची शिकण्याची भावना वाढीस लागते, तसेच विद्यार्थ्यांचे वाचन आकलन कौशल्य सुधारू शकते (विना अंजियाव इतर 2017)

अध्ययनातील विविध कल्पना आणि संकल्पनांचे अध्ययन करण्याकरिता विद्यार्थी स्व प्रेरणेद्वारे संपूर्ण प्रयत्न लावून अध्यंयन करित असतो अध्ययनार्थीचा अध्ययन प्रक्रियेत सक्रिय सहभागी असतो. स्वतःच्या अध्ययनात रमतो, व स्व व परिसर याचा समन्वय साधून स्वतःच्या संदर्भातून अर्थ लावतो. खेळ, कथा, गाणी, संगीत, कला आणि चित्रकला यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून आनंददायी अध्ययन पाठ हे प्रभावी अध्ययन अनुभव ठरतात.जे विद्यार्थ्यांच्या वातावरणाशी आणि त्यांच्या भूतकाळातील ज्ञान व अनुभवाशी सुसंगत असतात आनंददायी अध्ययन प्रक्रियेत अध्यापनाच्या पारंपारिक अध्यापन खडू फळा पद्धतीची जागा विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा आणि अभिरुची पूर्ण अध्ययन अनुभवानी घेतली की जे उत्पादनापेक्षा प्रक्रियेवर अधिक केंद्रित आहेत

मेंदूच्या वैधतेवर आधारित संशोधनाने मांडलेले आहे की, अध्ययन प्रक्रियेतील आनंद नसेल असेल तर त्या अध्ययनाला अर्थ उरत नाही. आनंददायी शिक्षण ही खऱ्या अध्ययनाची गुरुकिल्ली आहे.क्रशेन 1982 (शिक्षण सैद्धांतिक) यांनी केलेल्या अभ्यासातून सिद्ध केले कीतीव्र सकारात्मक भावना अध्ययनाकरिता महत्वपूर्ण असते. सकारात्मक भावना संलग्नीत असतील तर विद्यार्थ्यांकडून चिरंतन अध्ययन टिकविले जाते. बोधात्मक मानसशास्त्रीय अभ्यासाद्वारे काही चिकित्सक पुरावे (clinical evidences) म्हणतात की निरुत्साही, उदासी, ताण, संदिग्धता, चिंता आणि प्रेरणेचा अभाव शिक्षण प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण करते.

विद्यार्थ्यांमधील सर्जनशील विचार प्रक्रिया कौशल्याच्या विकासाकरिता आनंददायी अध्ययनाचा परिणाम एनेंगजुबाडे यांनी बघितला. ते म्हणतात की, पारंपरिक व आनंददायी अध्यापन यामधील तुलनेत आनंददायी अध्यापन हे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर त्याचा परिणाम आढळतो.

जुडीविलीस या मेंदूतज्ञाने आनंददायी शिक्षण या संकल्पनेचा शोध लावला ते माध्यमिक

शाळेतील शिक्षक होते. वर्ग खोल्यांची मर्यादा ओलांडून बालमनाला शिकण्याकरिता प्रेरित करणे हा आनंददायी शिक्षणाचा उद्देश आहे. प्रकल्पाधारित शिक्षण, कृती आधारित शिक्षण, समावेशित वर्गखोल्या, या अनेक माध्यमातून विद्यार्थी मन चेतविले जाऊ शकते. वर्गातील विद्यार्थ्यांना व्यस्त ठेवण्याकरिता देखील ही माध्यमे उपयुक्त आहेत. विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा जागृत करणे, सर्जनशीलतेला वाव देणे, मूल्याधिष्ठित शिक्षण देणे व चारित्र्य घडविणे ही सुद्धा कृती आधारित अध्यापनाची परिमिती आहे. आनंददायी शिक्षण हे एक असे शिक्षण आहे, ज्यात वास्तव रूपाने सहकार्य वृत्ती विकसित होते योग्य व अर्थपूर्ण अध्ययन करता येते. आनंददायी शिक्षण प्रक्रिया ही तेव्हाच महत्वाची असेल जेव्हा अध्ययन अनुभवांमध्ये आनंद हा घटक सम्मीलीत करता येईल. आनंदपूर्ण व खेळाच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण व्दि्यार्थ्यांना तेजस्वी प्रकाश देईल. सर्वसमावेशी वर्ग खोलीमध्ये क्रियाशील व सहकार्य पूर्ण कार्यनीती विकसित होतील व आनंददायी शिक्षण देता येईल. आनंददायी शिक्षण म्हणजे अध्ययनार्थीची सकारात्मक बौद्धिक आणि भावनिक अवस्था होय. अध्ययन प्रक्रियेद्वारे आनंद आणि समाधानी संवेदना प्राप्त होणे, म्हणजेच आनंददायी शिक्षण होय (2007 एलिस उदवरीसो व इतर)

**शिक्षण म्हणजे आनंद :**

शिक्षण आनंददायी असल्यास ते शिक्षण उत्पादन क्षम व नवनिर्माण क्षमतेला वाव देणारे असते. विद्यार्थ्यांमधील उत्साह, शिकण्याची ओढ निर्माण करणारे असते. अध्ययन व अध्यापन प्रक्रियेला ऊर्जा देणारे असते. व्यवसाय निष्ठा जपणारे अध्ययनार्थी व अध्यापनाप्रती समर्पण भाव जपणारे शिक्षक आनंददायी शिक्षण देण्यासाठी अग्रेसर असतात. सतत काहीतरी नवीन देण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करून विद्यार्थी सुद्धा तितकाच अध्ययनाप्रती जिद्द व चिकाटी बाळगणारा व्हावा, यासाठी सुद्धा ते प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांमधील अध्ययन प्रवणता जागृत करणे, हा शिक्षकाचा मूळ उद्देश असतो. याकरिता बरेचसे शिक्षक प्रयत्नशील राहून नवनवीन अध्यापन पद्धती, कौशल्य तसेच साधने स्वस्तरावर निर्माण करीत असतात. उदाहरणार्थ: संगीताच्या माध्यमातून गणित शिकविण्याकरिता शिक्षकांनी केलेले शालेय प्रयोग आपण वृतपत्रे व दूरदर्शनच्या माध्यमातून बघत आहोतच. गणितासारख्या कठीण विषयाला संगीतासारख्या सौंदर्यात्मक मूल्य विकसित करणाऱ्या विषयासोबत जेव्हा जोडले जाते, तेव्हा अध्ययन व अध्यापनाची परिमिती काय असेल याला प्रत्यक्षदर्शीणेच अभ्यासावयाची आहे. या व अशा अनेक प्रकारच्या नवनिर्माणक्षण शिक्षकांचे प्रयोग म्हणजेच आनंददायी शिक्षण होय. आनंददायी शिक्षणाचे हे आव्हान क्रियाशील व व्यवसायानिष्ठ शिक्षकांपुरतेच मर्यादित न राहता, प्रत्येक शिक्षक याकरिता जागरूक वक्रियाशील होईल, या दृष्टीने पाठ्यक्रमातच आनंददायी शिक्षणाचा पोषक पाठ्य घटकांचा उपक्रम व अभ्यासपूर्वक कार्यक्रमांचा जाणीवपूर्वक समावेश व्हावा अशी तरतूद करण्यात यावी आनंददायी शिक्षणाचा परिणाम शोधल्यास तो कशाप्रकारे विद्यार्थ्यांना ऊर्जा, उत्साह व अध्ययनाकरिता उत्सुकता निर्माण करतो,

याचे दर्शन घडेल. आनंददायी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना मिळणारे चेतक हे खरेच प्रेरणादायी ठरेल. शालेय व उच्च शिक्षणाची ठरविलेली उद्दिष्टेही अध्ययन परिणाम सार्थक करतील यात शंका नाही आनंददायी शिक्षण ही एक अशी संकल्पना आहे जी विद्यार्थ्यांच्या बुद्धी व शरीराला सतेज व प्रोत्साहित करते. 'क्रियाशीलता' हा मनुष्यप्राण्याचा उपजत गुणधर्मआहे त्याला व्यस्त राहण आवडत.काम नसले तर तो थकतो, कंटाळतो, उदासीन होतो.याकरिता सुदधा आनंददायी शिक्षण प्रभावी ठरतं. सतत अभिरुचीपूर्ण व्यस्ततेमुळे विधयार्थी प्रेरित होतो आणि पर्यायाने अनुकूल अध्ययन निष्पत्ती होतांना आढळते.

मानसशास्त्रज्ञ जुडी विलीस यांच्या संशोधनाद्वारे काही निष्कर्ष दिले आहेत ते पुढीलप्रमाणे -

- अध्ययनार्थीच्या मेंदुमध्ये कुठलीही माहीती स्थलांतरित आणि साठवण्याच्या प्रक्रियेवर त्याच्या स्वत:च्या अनुकूलतेचा प्रभावी परिणाम होत असतो.
- भावनिक ताणाचा विध्यर्थ्यांच्या नवीन संकल्पनेच्या अध्ययनावर, पूर्व अभ्यासावर, उच्च विचार प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होतो अथवा मेंदूद्वारे याकरिता नकार दर्शविला जातो
- प्रभावी सकारात्मक भावना या अध्ययन धारणेला वाढविण्याशी संबंधित असतात.

यावरून उत्साही वर्ग वातावरण, सकारात्मक अध्ययन आणि ताण विरहित अध्यापन हे प्रभावी अध्ययनाससाठी उपयुक्त ठरते.

पूर्व प्राथमिक शाळेमध्ये जर शिक्षक स्वतचे साहित्य वर्गात घेऊन आले व मोठ्या आशेने विध्यर्थ्यांसोबत संवाद साधू लागले तर नक्कीच विद्यार्थी अपेक्षित प्रतिसाद दर्शवतील याची शाश्वती देता येणार नाही.पूर्व प्राथमिक शाळेतील विध्यर्थ्यांचे वय वर्ष लहान असल्याने अधिकच नाजुक व लवचिक असतात.या वयातील विधयार्थी म्हणजे भविष्याला आकार देण्याकरिता शाळेमध्ये आलेला घटक होय.या वयातील अनुभव हे त्यांच्या मेंदूच्या विकासावर प्रभाव पडणारे असतात. कथन पद्धती किंवा व्याख्यान पद्धतीने या वयातील अध्ययन स्थिरावणारे नसते,तर विध्यर्थ्यांना चेतवणारेआणि शालेय वातावरणात टिकाव धरण्याची क्षमता निर्माण करणारे अनुभव या वयात मिळायला हवे.

S. Anggorror, W. Sopandi आणि M. Sholehuddin अध्ययनाकरिता उपयुक्त पद्धती, साधने, योग्य अध्ययन माध्यम आणि चांगले शिक्षक यामुळे सकारात्मक बोधात्मक अध्ययन अनुभव मिळतात. तसेच ज्या विध्यार्थ्यांचे विज्ञान विषयाविषयी सकारात्मक विचार असतात. विज्ञान हा आपल्याकरिता उपयुक्त विषय आहे असा समज ज्या विध्यार्थ्यांचा असतो, ते अध्ययन प्रक्रियेमध्ये आनंद घेतात, व्यस्त होतात आणि अभ्यासाकरिता कठीण परिश्रम घेतात. याउलट विज्ञान अध्ययन म्हणजे ताण किंवा ओझे समजणारा विद्यार्थी आळशी आणि त्रासदायक वर्तन दर्शवीत असतो. याचाच अर्थ आनंददायी शिक्षण निर्माण केल्याने विज्ञान अध्ययनातील अडथळे दूर होण्यास मदत होते।

ज्ञान व कौशल्ये सुख आणि आनदासह आत्मसात करणे .नवीन संकल्पना आणि नवीन

आशयासह सर्व अडथळ्याला दूर सारून कायमस्वरूपी आस्वाद हा या शिक्षण पद्धतीमुळे घेता येतो विध्यार्थ्यांना कुठलाही थकवा व कंटाळा न येता उत्साहाने एखादे कोडे सोडवणे, प्रकल्प करणे कूट प्रश्न सोडविणे, खेळ खेळणे या विविध माध्यमातून अध्ययन अनुभव देता येतात ज्यायोगे विद्यार्थी आनंदाने अध्ययनासाठी तत्पर होतो.

गणित विषयाच्या अध्यापणामद्धे शिक्षकांनी विविध कल्पनाचा विकास करून विध्यार्थ्यांकरिता प्रेरणादायी आनंददायी उपक्रमांचे आयोजन करायला हवे, उदाहरणार्थ संशोधन, रचना, अभिकल्प, कार्यनीती आणी समश्या समाधान अश्या उपक्रमांचा समावेश खेळ, कोडे आणी इतर उपक्रमांसाठी करावा.संगणक सहायीत अध्य्यांनाचा विध्यार्थ्यांच्या उपचारात्मक अध्ययनासाठी अतिशय महत्वपूर्ण वाटा असतो. या विषयाच्या अनुषंगाने केवळ ज्ञानातच भर पडत नाही तर विचारप्रक्रिया प्रेरित होते, नवनवीन कल्पना सुचतात आणि त्यामुळे कल्पनाशक्ति वृध्दिंगत होते

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि आनंददायी शिक्षण -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शालेय शिक्षण या घटकाच्या अंतर्गत शाळांमधील अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र यामध्ये शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असले पाहिजे असा उल्लेख केलेला आहे .त्यानंतर विचार करण्याचे इतर महत्त्वाचे केंद्रीय मुद्दे या शीर्षकाखाली भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन या मुद्द्यांचा समावेश केलेला आहे. विध्यार्थ्यांमधील सर्वांगीण विकास करण्यासाठी पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत अध्ययनाच्या विविध टप्प्यांवर एकात्मीकरण आणि समावेशन करण्याकरिता विविध क्षेत्रातील विविध कौशल्ये व मूल्ये निश्चित केले जातील. ही मूल्ये शिकविण्याकरिता किंवा प्रब्भावीपणे विध्यार्थ्यांच्या अध्ययनाकरिता रंजक अश्या अध्यापन पध्दतीचा म्हणजेच आनंददायी अध्यापन पद्धती व अद्यापनशास्त्राचा उपयोग करावा.यामुळे विध्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये व मूल्ये आत्मसात केले जातील,असे सुचविलेले आहे. विध्यार्थ्यांमधील तार्किक विचार व क्षमता वाढविण्याकरिता अभ्यासक्रमाचा मजकूर कमी केला जाईल. अनुभवात्मक शिक्षण ही संकल्पना वाढीस लावण्याचा विचारही NEP 2020 मध्ये मांडला गेला आहे. यानुसार प्रात्यक्षिक शिक्षण, कला, खेळ यांचा समावेश सर्व स्तरावरील शिक्षणात करण्यात यावा. वर्गातील वातावरण आनंदी राहावे, तसेच अध्ययन अध्यापन प्रक्रियेत भारतीय कला आणि संस्कृती एकत्रित करून भारतीय संस्कार बिंबविण्यासाठी कलासक्त शिक्षण वर्गातील व्यवहारामध्ये समाविष्ट केले जाईल असे मांडण्यात आलेले आहे.

विध्यार्थ्यांमधील तार्किक क्षमता विकसित करण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर कमी करावा. सखोल व अनुभवात्मक शिक्षणासाठी वर्गाध्यापणात मनोरंजक, सर्जनशील, सहयोगात्मक आणि संशोधक उपक्रमांचा नियमितपणे समावेश असेल.प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर अनुभवात्मक (experiential) अध्ययनाचा समावेश करण्यात येईल. यामुळे केवळ परीक्षा केन्द्रित पद्धतीमध्ये व्यस्त शिक्षक अध्यापणामध्ये उपयोगीत्त पद्धतींचा उपयोग करतील व सखोल चिंतनाच्या आधारे

अध्यापन चालेल.तसेच वर्तमान परीक्षा केन्द्रित शिक्षण पद्धतीला काही अंशी परिवर्तनाची दिशा मिळेल. अभ्यासेतर व अभ्यासपूरक कार्यक्रमांतर्गत प्रात्यक्षिक शिक्षण, कला व खेळ यांचा अंतर्भाव केला जाईल. आनंददायी शिक्षण देण्याकरिता बहू-अभ्यासक्रमिय अध्यापन दृष्टीकोण NEP 2020 मध्ये उल्लेखित आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून भारतीय प्रगल्भ अशी कला व संस्कृती जोपासण्यासाठी सुद्धा याची महणीय मदत होईल. विध्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी व आकलन क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी क्रीडा एकात्मिकरण ही एक नवी संकल्पना या धोरणाने प्रतिपादिली आहे. प्राथमिक स्तरावर कठीण वाटणारा गणित विषय हा कोडी व खेळांच्या माध्यमातून शिकविला जाईल. ज्यामुळे विध्यार्थी गणित विषयाला मजेदारपणे शिकतील. उपक्रमांच्या साहायाने गणित विषय शिकविल्यामुळे हा विषय गुंतवून ठेवणारा म्हणजेच त्यांना अधिकाधिक सराव करवून घेणारा असेल. याचाच अर्थ अनुभव व अवधानाची परिणीती अभिरुचित होऊन काठिन्यता संपेल.व्यावसायिक कला कौशल्याचा विकास करण्याकरिता इयत्ता 6 ते 8 या दरम्यान विध्यार्थ्यांच्या कारक कौशल्याना योग्य चालना मिळून कौशल्य संपादित विध्यार्थी वर्ग तयार होईल.ज्यामुळे बेरोजगारी काही अंशी संपृष्टात येईल. उपजत कलांना देखील यामुळे वाव मिळेल.

स्थानिक खेळ व आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून विविध विषय शिकण्याकरिता शाळांमधून स्पर्धा घेता येतील. राष्ट्रीय शिक्षण आयोग 2020 नुसार शालेय शिक्षण स्तरावर केवळ बौद्धिक विकासावर भर न देता विध्यार्थ्यांच्या मानसिक व भावनिक विकासाकरिता सौंदर्यात्मक मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या विषयांचा समावेष अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. कला, हस्तकला, संगीत आणि नृत्य या विषयाशी संबंधित पारंपारिक कलेतील तज्ञ किंवा या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तीची निवड शिक्षण प्रक्रियेत करण्याची तरतूद केलेली आहे.भाषा शिक्षण आणि सांस्कृतिक एकात्मता करण्याच्या उद्देशाने सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार भारतातील सर्व राज्ये व केंद्रशाषित प्रदेशांमध्ये या विषयाशी संबंधित शालेय स्तरावरील उपक्रमांची यादी सुचविण्यात आली जी सर्व शाळांना सामायीकपणे लागू करण्यात येईल. भारतीय इतिहास, संस्कृति, पौराणिक कथा आणि आचरण यावर आधारित आत्मनिर्भर भारत या संकल्पनेच्या आधारे नवीन खेळ व खेळ साहित्य निर्माण संकल्पना विचारात घेतली गेली आहे. स्थानिक साहित्याच्या माध्यमातून सृजनशील खेळण्यांची निर्मिती करावी. ही खेळणी उच्च गुणवत्तेची, सुरक्षित, परवडणारी पर्यावरण संतुलित असेल. या खेळण्यांना भारतीय व जागतिक बाजार पेठांमध्ये मागणी मिळावी. हा आमच्या पुरातन भारतीय संस्कृतीचा भाग आहे ज्याचा विचार NEP 2020 मध्ये करण्यात आलेला आहे. यामुळे विध्यर्थ्यांमधील उच्च विचार क्षमतेला चालना मिळेल. दि. 14 मे 2020 ला 'कलासेतू' नावाचे पोर्टल सुरू करण्यात आले. याचा मुख्य उद्देश म्हणजे आनंदी वर्गखोल्या तयार करणे हा आहे. भारतीय कला व संस्कृतीच्या माध्यमातून भारतीय नीतीमत्ता जपली जाईल.शिक्षण व संस्कृतीचा संबंध जोडता येईल. अध्ययन अध्यापन प्रक्रियेला चालना मिळेल.

कठीण संकल्पना सहज आणि आनंदी पद्धतीने समजावून सांगन्यासाठी ग्राफिक कादंबऱ्या विकसित करण्यात आल्यात. जे चिकित्सक विचार व समस्या निराकरण यावर आधारित आहेत. 'कोगिटो 'ही चिकित्सक विचारसरणीचे आकलन करते, तर 'प्रश्नपुस्तिका' हे समस्या निराकरणाचे पैलू स्पष्ट करते. कला एकात्मिकरण आणि उपयोजनाधारीत अध्ययनाला चालना देण्यासाठी NCERT पाठ्यक्रमातील पाठयघटकावर आधारित 100 ग्राफिक नॉवेल तयार करण्यात आले. जे कथाकथन पद्धतीला अध्यापनशास्त्राचे प्रभावी साधन म्हणून पुरस्कृत करते.

अशाप्रकारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आनंददायी शिक्षणासंबंधित विविध उपाय सुचविलेले आहेत. वास्तविकरूपाने जेव्हा हा अभ्यासक्रम राबविण्यात येईल तेव्हाच त्याचे परिणाम अथवा प्रभाव अभ्यासता येईल.

**संदर्भ :**


1. देसले विजयकुमार,(2020) आनंददायी शिक्षण - शहापूर जिल्हा ठाणे
2. कामत माधवी,(2022) अंगणवाडी आनंददायी शिक्षण, श्रावणी प्रकाशन
3. गुप्ते ललिता, आनंददायी शिक्षणासाठी धडपड वसा, अनुश्री प्रकाशन
4. Udvari-Solner Alice et.al (2008), Joyful Learning: Active and Collaborative Strategies for Inclusive Classrooms, Kindle Edition
5. Park Oak (2017) Joyful Learning: Active and Collaborative Learning in Inclusive Classrooms, Corwin Press
6. HANDBOOK OF JOYFUL LEARNING (2020) Published by: Central Board of Secondary Education, Shahdara, Delhi-110032
7. Stephanie Farley (2023) Joyful Learning Tools to Infuse Your 6-12 Classroom with Meaning, Relevance, and Fun,published by Routledge
8. AnggoroS. Etal (2017). Influence of joyful learning on elementary school student's attitude towards science
9. Weic, HungI. C. (2011). Joyful learning
10. Vinaanggiaetal (2017), https://www.researchgate.net/publication/320469716 Joyful learning strategy using game method of treasure clue to improve reading comprehension skill
11. www.freenaleen.blogspot.com
12. www.hindustantimes.com